अरविंद पोरेड्डीवार यांचे प्रतिपादन; व्हॅनद्वारे जागृती

# नागरिकांनी बँक व्यवहार समजून घ्यावेत

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडचिरोली :** भारत सरकार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व नाबार्डच्या वित्तीय समावेशन कार्यक्रमाअंतर्गत मोबाईल व्हॅनद्वारे दुर्गम भागातील लोकांपर्यंत विविध योजनांची माहिती व बँकिंग सुविधेचा लाभ घेण्याकरिता ग्रामीण भागातील लोकांनी बँकेच्या आर्थिक साक्षरता कार्यक्रमांत सहभागी व्हावे, असे प्रतिपादन जिल्हा मध्यवर्ती बँकेचे ज्येष्ठ संचालक अरविंद पोरेड्डीवार यांनी केले.

आर्थिक साक्षरता कार्यक्रमांतर्गत नाबार्डतर्फे महाराष्ट्रातील जिल्हा बँक व ग्रामीण बँकांना मोबाईल व्हॅनचे वितरण करण्यात आले आहे. व्हॅनचे लोकार्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी पोरेड्डीवार बोलत होते. कार्यक्रमाला केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, नाबार्डचे मुख्य महाप्रबंधक गोवर्धन रावत आभासी पध्दतीद्वारे उपस्थित होते. यावेळी गडचिरोली जिल्हा बँकेला नाबार्डतर्फे आर्थिक साक्षरता कार्यक्रमाकरिता दिलेल्या दोन मोबाईल व्हॅनचा शुभारंभ बँकेचे ज्येष्ठ संचालक अरविंद पोरेड्डीवार यांच्या हस्ते गडचिरोली जिल्हा बँकेच्या प्रांगणात संपन्न झाला.



कर्ज मंजुरीचे प्रमाणपत्र देताना संचालक अरविंद पोरेड्डीवार, सोबत सतीश आयलवार.

यावेळी गडचिरोली जिल्ह्यात आर्थिक साक्षरता कार्यक्रमांतर्गत व विकासात्मक कार्यात केलेल्या कार्याबद्दल नागेश्वर चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव एच. मूर्ती यांना प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच सुक्ष्म कर्ज पतपुरवठा अंतर्गत प्रतीक्षा महिला बचत गट, मुडझा यांना गडचिरोली जिल्हा बँक शाखा, नवेगाव, विनय साळवे, निखिल बारसागडे, राजू खरकाटे यांना शासकीय कर्ज योजनेंतर्गत विविध व्यवसायाकरिता कर्ज मंजुरीपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी नाबार्डचे जिल्हा व्यवस्थापक राजेंद्र चौधरी, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश आयलवार, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक नेलसन बास्के व ग्रामीण बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक खाडे उपस्थित होते.

दै. लोकमत दि. ८ जाने. २०२२